महाराष्ट्र पोलीस

# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र





०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ५०२ /पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांकः- १६ /०९/२०१८

## " अल्पयीन मुलीवर सामुहीक बलात्कार करणाऱ्या ईसमांना २० वर्षे सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"

पोलीस ठाणे कारधा अंतर्गत मौजा दिघोरी (आमगाव) ता.जि. भंडारा येथिल राहणारे वसंत विजय रेहपाडे, प्रविन गंगाराम रेहपाडे व प्रमोद रेहपाडे यांनी गावातील १४ वर्षीय अल्पयीन मुलीवर सामुहीक बलात्कार केल्याचे आरोप सिध्द झाल्याने दिनांक १५.०९.२०१८ रोजी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे न्यायाधिश श्री. संजय आ. देशमुख सा. यांनी आरोपी वसंत व प्रविन रेहपाडे यांना २० वर्षे सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहीती अशी की, अल्पयीन पिडित मुलगी हि दिनांक २२.०४.२०१६ रोजी सकाळी १०.०० वा. सुमारास ग्राम दिघोरी (आमगाव) येथे आपले घरी लहान बहिन तसेच शेजारी राहणारी मैत्रिण असे हजर असतांना गावातील मैत्रिण हिने भेटण्यास बोलविल्याने तिस भेटण्याकरीता तिचे घराकडे रोड ने जात असता प्रविन रेहपाडे याचे घरा समोर प्रविन रेहपाडे, वसंता रेहपाडे व प्रमोद ऊर्फ पप्पु रेहपाडे हे हजर होते. या तिघांनी संगनत करून पिडितेस जबरीने तोंडाला दाबुन पकडुन प्रविन रेहपाडे याचे घरात नेले आणि प्रविन व प्रमोद यांनी छपरीतील दार आतुन बंद केला अल्पवयीन पिडित यांना प्रतीकार करीत असता प्रमोद रेहपोडे ब प्रविन रेहपाडे यांनी पिडितेस जबरीने पकडुन वसंत रेहपाडे यांने पिडितेवर बलात्कार केला. तिघांनी पिडितेस जबरीने प्रविन रेहपाडे याचे घरी नेत असतांना शेजारील अल्पवयीन मुलाने पाहिल्याने सदरची माहिती पिडितेचे आईस जावुन सांगीतले वरून पिडितेची आई प्रविन रेहपोडे याचे घरा जवळ येवुन आवाज देत असता तिघांनीही पिडितेस प्रविन रेहापाडे याचे घराचे मागिल दाराने जाण्यास सांगुन झालेल्या घटणेची माहिती कोणासही सांगीतल्यास ठार मारण्याची धमकी दिल्याने पिडिते अल्पयीन मुलगी ही मागील दाराने निघुन गेली. तिन्ही नराधंमांधी पिडितेस जिवानीशी ठार मारण्याची धमकी दिल्याने घटणेची माहिती भितीपोटी आपल्या आई-वडीलांना सांगीतली नाही. परंतु वसंत, प्रविन व प्रमादे यांनी पिडिते सोबत केलेल्या कुकर्माची माहिती आखीर दिनांक २६.०४.२०१६ रोजी पिडितेने आपले आई-वडीलांना दिलेवरून त्यांचेसह पोलीस ठाणे कारधा येथे येवुन प्रविन रेहपाडे, वसंता रेहपाडे व प्रमोद ऊर्फ पप्पु रेहपाडे यांचे विरूध्द तक्रार दिल्यावरून सदर आरोपींता विरूध्द अपराध क्र. ४६/१६ कलम ३७६(१)(२)(आय)(ड)(ज), ५०६ भादवि सहकलम ४,६ बाल लैंगिक प्रतीबंधक अधिनीयम २०१२ तसेच पिडित अल्पवयीन मुलगी ही गोंड जातीची असल्याने कलम ३(१)(१२) अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतीबंधक कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास **श्री. संजय जोगदंड, उप विभागीय पोलीस अधिकारी भंडारा** यांनी घटणेचे गांभिर्य लक्षात घेता तात्काळ घटणास्थळ गाठुन तपासला सुरवात केली व गुन्हयातील आरोपी क्र.१) वंसत

विजय रेहपाडे, वय २७ वर्ष, क्र. २) प्रविन गंगाराम रेहपाडे, वय २० वर्ष, क्र.३) प्रमादे ऊर्फ पप्पु देवदास रेहपाडे, वय १४ वर्ष तिन्हा रा. दिघोरी (आमगाव) ता.जि.भंडारा यांना तात्काळ कायदेशिर अटक करून पिडित मुलीची व आरोपीची वैद्यकीय तपासणी करून गुन्हयात साक्षपुरावा गोळा केला. आरोपी विरुध्द योग्य व सबळ पुरावे मिळुन आल्याने आरोपी वसंत रेहपाडे व प्रविन रेहपाडे यांचे विरूध्द आरोपपत्र प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय तथा विशेष न्यायालय, भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास विशेष खटला क्र. २४/१६ अन्वये सुनावणी करीता ठेवण्यात आले. तर आरोपी प्रमादे ऊर्फ पप्पु देवदास रेहपाडे हा अल्पवयीन असल्याने बाल न्यायालय, भंडारा येथे आरोपीपपत्र दाखल केले असुन न्याय प्रलंबित आहे.

सदर गुन्हयातील आरोपी वसंत व प्रविन रेहपाडे यांचे विरूध्द सुनावणी **प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश श्री. संजय आ. देशमुख सा.** यांचे न्यायालयात चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्रीमती दुर्गा तलमले, सहा. सरकारी अभियोक्ता, सत्र न्यायालय भंडारा** यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. सदर खटल्यात क्षपरीक्षेअंती दिनांक १५.०९.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरुप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी १) वंसत विजय रेहपाडे, वय २७ वर्ष, क्र. २) प्रविन गंगाराम रेहपाडे, वय २० वर्ष** याचे विरुध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३७६(१)(२)(आय)(ड)(ज) भादवि मध्ये २० वर्षे सश्रम कारावास व पिडितेस प्रत्येकी ५०,०००/-रुपये नुकसाण भरपाई देण्याचे आदेशीत केले तसेच कलम ५०६ भादवि मध्ये ३ वर्षे कारावास व प्रत्येकी १००० रूपये दंडाची शिक्षा तसेच कलम ३(१)(१२) अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतीबंधक कायदा अन्वये ३ वर्षे कारावास व प्रत्येकी १००० रूपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली**. सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक, गजानन कंकाळे, ठाणेदार पोलीस ठाणे कारधा यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार सिताराम ब्राम्हणकर/७१ यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

**अल्पवयीन मुलाची साक्षठरली महत्वाची** :- पिडितेस आरोपी प्रविन रेहपाडे याचे घरात घेवुन जात असताना एका अल्पवयीन मुलाने घेवुन जातांना बघीतले होते. त्या अल्पवयीन मुलाची न्यायालयात साक्ष झाली. त्याने अतीशय योग्य साक्ष दिली. आरोपींना शिक्षा होण्यास सदर साक्ष महत्वाची ठरली

(जितेंद्र के. आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ०९४०३१०९७२०

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनीधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत**, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.